ज्ञानदीप लावू जगी

# पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

पुस्तकाचे नाव : अळंदीची यात्रा

प्रकाशक : बॉम्बे ट्रॅक्ट अ‍ॅण्ड बुक सोसायटी, बॉम्बे

प्रकाशन वर्ष : १८९९

मूळ ग्रंथ प्रत : शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे

पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प

अंकेक्षण रुपांतर - २०२३

# अळंदीची यात्रा.



किंमत पाव आणा.

# THE PILGRIMAGE TO ALANDI.

# अळंदीची यात्रा.



BOMBAY TRACT AND BOOK SOCIETY.

MARATHI 16mo. Series. 10th Edition.

2,000 Copies. A. D 1899.

मुंबईमध्यें:— "निर्णयसागर" छापखान्यांत छापिली.

सन १८९९.

# THE PILGRIMAGE TO ALANDI.

# अळंदीची यात्रा.

पुण्यापासून साहा कोसांवर अळंदी ह्मणून एक गांव आहे, तेथें कार्तिक वद्य एकादशीस मोठी यात्रा भरत असती. त्या यात्रेस ब्राह्मण, शूद्र, सोनार, शिंपी इत्यादि अनेक जातींचे हजारों लोक जात असतात, असें माझ्या ऐकण्यांत आलें. मी पुण्याजवळ गारपीर ह्मणून लष्कराची जागा आहे तेथें रहात असतों. परंतु जेथें हजारों लोक जमतात, तेथें अनेक चमत्कार दृष्टीस पडतात, ह्मणून आपणही त्या गांवास जावें असा निश्चय करून मी दशमीस सकाळीं चालता झालों. पुण्यापासून सुमारें दोन कोस गेलों तों वाटेनें दोन परदेशी शिपाई जात होते त्यांस मीं पाहिलें. तेव्हां त्यांचें माझें कांहीं संभाषण झालें तें येणेंप्रमाणें—

शिपाई बाबा, तुह्मी कोठें जातां?

शि०—हम अळंदीके मेलेको जाते हैं.

तेथें कोण देव आहे?

शि०–हमको क्या मालूम? कोई गेनोबा है ऐसा लोक कहते हैं.

तुह्मी कोठें असतां?

शि०–हम लखनौके रहनेवाले हैं, लेकिन हम यहां नौकरीकेवास्ते फिरते फिरते आये, और अब लष्करमें नौकरी करते हैं.

तुह्मी नौकर असतां रजा घेऊन यात्रेस चाललां, हें मोठें आश्चर्य आहे.

शि०–हमने कभी उधरका मेला देखा नहीं, इसलिये वो देखनेके इरादेसे और जो कोई दैवत वहां है उस्के दर्शनके लिये हम रजा लेकर जाते हैं.

बरें मलाहि अळंदीस जावयाचें आहे, चला.

असें बोलून पुढें सुमारें एक कोस गेलों, तों कापडकरी, कांसार, हलवाई, माळी, इत्यादि पुष्कळ उदमी लोक पाहिले, त्यांतील एका ह्यातान्या भोळ्या उदम्याशीं माझें संभाषण झालें तें येणेंप्रमाणें:—

कां शेटजी, आज तुह्मी सर्व मिळून कोणत्या बाजारास उदीम करायास जात आहां?

उद०—उद्यां अळंदीस मोठी यात्रा भरेल, तेथें आपणहि यात्रेस जावें, व कांहीं माल विकून दोन पैसे कमवावे या हेतूनें जातों.

मग मी बोललों, केवळ देवासाठीं जाणारे असे हजारांमध्यें पांचहि सांपडणें कठीण. तेथें कापडचोपड वगैरे जिन्नस स्वस्त मिळत असेल नाहीं बरें?

उद०—स्वस्त कशाचा? शहरापेक्षांहि महाग पडतो.

मी ह्मणालों, याचें कारण काय? लोक फार येतात ह्मणून?

उद०—नाहीं, नाहीं. तेथें पुष्कळ भाविक व अज्ञानी लोक यात्रेंतील हा माल देवाचा प्रसाद आहे असें समजून आह्मी सांगतों ती किम्मत देऊन मोठ्या भक्तीनें घेतात, ह्मणून आह्मांस दोन पैसे मिळतात.

मी ह्मणालों, यात्रेस जाऊन त्या गरीब यात्रेकऱ्यांस फसवून अशी ज्यास्त किम्मत घ्यावी हें तुह्मांस योग्य आहे कीं काय?

उद०—हें तुह्मी काय पुसतां? आधीं पोटोबा मग विठोबा. तशांत या रीतीनें पैसा मिळविणें हा आह्मां व्यापारी

लोकांचा धर्मच आहे; जर आह्मी कानांत तुळशी घालून बसूं, तर पोट कसें चालेल बरें?

मी ह्मणालों, छे छे, कधीं कोणास फसवूं नये, हेंच योग्य आहे. पोटासाठीं मिळविण्याचे दुसरे पुष्कळ मार्ग आहेत. असें सांगून मीं त्या लोकांस पुष्कळ बोध केला, तरी माझें बोलणें त्यांस रुचलें नाहीं. मग मी पुढें चालता झालों तों तेरा चवदा मनुष्यांची दिंडी माझ्या दृष्टीस पडली. त्यांतील प्रत्येक मनुष्याचे हातांत भगवी पताक व एक एक टाळ होता. आणि एकाच्या हातांत विणा व चिपळ्या होत्या. आणि विणेवाला जें गाणें गाई तें त्याच्या मागून सर्व लोक गाऊन मोठा गोंगाट करीत चालले होते. मी त्यांच्या जवळ गेलों, तों हा अभंग माझ्या ऐकण्यांत आला, "नामसंकीर्तन साधन पैं सोपें, जळतील पापें जन्मोजन्मीं." तेव्हां मी त्यांस कांहीं पुसूं लागलों पण त्यांनीं गडबडीमुळें कांहीं उत्तर दिलें नाहीं. मग ते तसेच भजनाच्या नादांत गुंगून चालले. मी तर अळंदीजवळ इंद्रायणी नदी आहे तेथें गेलों, आणि गोपाळपुऱ्यांत फार गर्दी नसेल, तेथें हवाशीर जागा आणि निर्मळ पाणी मिळेल ह्मणून तेथें राहण्याचा बेत केला. मग यात्रेचा समारंभ पाहण्या-

करितां गांवांत चाललों, तों जशीं झाडें आपल्या ऋतूमध्यें फुलांच्या भरानें फुलतात, तसा सर्व गांव मनुष्यांनीं फुलला आहे, आणि जसा सकाळीं व संध्याकाळीं झाडांवर चिमण्या कावळे इत्यादि पक्ष्यांचा कलकलाट होत असतो, तसा तो गांव चोहोंकडे कलकलाटानें भरला आहे, कोणाचें बोलणें कोणास ऐकूं येत नाहीं; तेथें मुंगीसहि रीघ नाहीं अशी गर्दी झाली होती, ह्मणून मी हळू हळू पुढें चाललों, तों जागोजागीं पालें लागलीं आहेत; ठिकाणोठिकाणीं अनेक प्रकारचे बाजार भरले आहेत. तेथें दासबोध, रामदासी श्लोक, पंचांगें इत्यादि पुस्तकें विकावयास आणलीं होतीं, त्यांत ख्रिस्ती शास्त्राचींहि पुस्तकें पाहण्यांत आलीं. मग मी देवळाकडे चाललों, तों पुष्कळ यात्रेकरू लोक हातांत झेंडूंच्या माळा व फुलें घेऊन मोठ्या लगबगीनें देवळांत जात आहेत. तेव्हां आपणहि देवळांत जावें असें माझ्या मनांत आलें, परंतु तेथें फार गर्दी होती, केवळ तोबातोबीशीं गांठ, असें पाहून मी आपल्या बिऱ्हाडाकडे परत गेलों. तेथें पाहतों तों जिकडे तिकडे धूर झालेला, मनुष्यांची फार गर्दी, दुर्गंधी, आणि पाणी गढूळ, असें

पाहून माझ्या मनाला वीट आला. मग गांवच्या मागल्या बाजूस जाऊन उतरलों, आणि यात्रेची मौज पाहत बसलों.

दशमीच्या दिवशीं फार पाऊस पडून चोहोंकडे चिखल झाला होता, यामुळें यात्रेकऱ्यांचे फार हाल व नुकसान झालें. तेव्हां माझ्या मनांत असें आलें कीं, ह्याप्रमाणें यात्रेकऱ्यांस दरवर्षी बहुत दुःख सोसावें लागतें आणि दाटी व घाण यांमुळें पंढरपूर व जेजुरी इत्यादिकांच्या यात्रांमध्यें जरीमरीचा उपद्रव वारंवार उत्पन्न होऊन हजारों मनुष्यें प्राणांस मुकतात. अरेरे! काय करावें, उपाय नाहीं, लोक वेडे आहेत.

मग मी जवळच एक समुदाय पाहिला. तेथें एक साहेब, दोन तीन ब्राह्मण, आणि पुष्कळ कुणबी लोक यांचें संभाषण चाललें होतें. जेव्हां तो साहेब कुणबी लोकांस प्रश्न करी तेव्हां कुणब्यांचें उत्तर ऐकून ब्राह्मण लोक वारंवार हंसत. मग मी तें त्यांचें संभाषण ऐकावयास जवळ गेलों. तें संभाषण येणेंप्रमाणें होतें.—

सा०–बरें, पाटील, ज्ञानोबा कोण होता?

कु०–तो देव होता.

हें ऐकून ब्राह्मण हंसतात.

सा०—शास्त्रीबुवा, ज्ञानोबाविषयीं तुमचें मत काय आहे ?

ब्रा०—तो देव तर नव्हता, पण मोठा साधु होता. (इतक्यांत दुसरा एक कुणबी ह्मणाला) तो ईश्वरी पुरुष होता.

सा०—हें कशावरून समजावें ?

कु०—त्यानें चमत्कार केले, त्यावरून.

सा०—ते चमत्कार तुह्मांस माहीत आहेत कीं काय ? असल्यास, त्यांतील कांहीं कृपा करून सांगा.

कु०—त्यानें रेड्याच्या मुखीं वेद बोलविले. पितरपाखाचे दिशीं जेव्हां बामन त्यासंगातीं जेवीतना तेव्हां त्यानें स्वर्गाहून पितरांस बोलाविलें, आणि ते त्यासंगातीं जेवले. त्यानें मेलेली गाय जिती करून उठविली. जेव्हां चांगदेव वाघावर बसून हातीं सापाचा चाबूक घेऊन गेनोबास भेटायास आले, तेव्हां गेनोबा भिंतीवर बसले होते, ती भिंत त्यांनीं चालविली. असे असे नानाप्रकारचे त्यानें चमत्कार केले.

सा०—या गोष्टी कधीं घडल्या हें कशावरून सिद्ध कराल ?

कु०—हें सर्व बामनांच्या बाडांत लिहिलें आहे.

सा०—बाडांत आहे किंवा नाहीं, हें आपण आतां या शास्त्रीबुवांस पुसूं. शास्त्रीबुवा, याविषयीं जें काय तुह्मांस माहीत असेल तें सांगा.

ब्रा०—त्याविषयीं शास्त्रांत कांहीं आढळत नाहीं.

सा०—वेदांत किंवा पुराणांमध्यें ज्ञानोबाचें नांव तरी सांपडतें कीं काय?

ब्रा०—त्यांत कशाचें? कोठेंहि सांपडत नाहीं.

सा०—बरें शास्त्रीबुवा, पुराणांत ज्ञानोबाची गोष्ट सांपडत नाहीं तर ती कोठें सांपडेल, हें कृपा करून सांगा.

ब्रा०—महिपतिबुवा ह्मणून एक ताराबादकर ब्राह्मण होता, त्यानें महाराष्ट्र भाषेंत भक्तिविजय व भक्तलीलामृत असे दोन ग्रंथ कवितारूपानें रचिले, त्यांत ज्ञानोबाची गोष्ट सांगितली आहे. भक्तलीलामृत ग्रंथ रचून ९९ वर्षें झालीं आहेत.

सा०—यावरून असें दिसतें कीं महिपतिबुवा सांप्रतकाळचे आहेत.

ब्रा०—खरी गोष्ट, ते या काळचे कवि होत.

सा०—ज्ञानोबाला किती वर्षें झालीं असतील बरें?

श्रा०—त्यानें ज्ञानेश्वरी हा ग्रंथ शके १२१२ रांत केला, यावरून ज्ञानोबाला ( खि० स० १८९१ सालांत ) ६०० वर्षें झालीं.

सा०—बरें पाटील, आतां ज्ञानोबा व महिपति यांमध्यें किती अंतर आहे हें तुह्मी सांगा.

कु०—( कांहींसा घुटमळून ) आह्मां अडाणी लोकांस हिशोबाची काय माहिती ? आतां साहेबांनीं सांगावें !

सा०—चारशें पंचायशीं वर्षांचें अंतर आहे. एवढें अंतर असतां महिपतीनें ज्ञानोबाविषयीं जें लिहिलें तें खरें कशावरून मानावें ? महिपतीला ज्ञानोबाची गोष्ट कशी कळून आली बरें ?

( तों कांहींसा हुशार असा दुसरा कुणबी ह्मणाला ) कदाचित् दुसऱ्या पुस्तकावरून त्यानें गोष्ट उतरून घेतली असेल.

सा०—त्या पुस्तकाचें नांव काय असेल बरें ?

कु०—ज्ञानोबाचे चमत्कार ज्ञानेश्वरीमध्यें लिहिले असतील; तेंच असेल.

सा०—काय हो हा यांचा वेडेपणा ! आतां शास्त्रीबुवा,

तुह्मी सांगा, त्या पुस्तकांत ज्ञानोबाचे कांहीं चमत्कार लिहिले आहेत ?

ब्रा०—ज्ञानेश्वरी ह्मणून जो प्राकृत ग्रंथ आहे तो गीतेवर टीका आहे. त्यामध्यें ज्ञानेश्वराच्या चमत्कारांविषयीं कांहींच लिहिलें नाहीं. परंतु नाभाजीबुवा ह्मणून एक कवि होता त्यानें हिंदुस्थानी भाषेंत साधुसंतांविषयीं एक ग्रंथ रचिला होता त्यावरून महिपतीनें हा ग्रंथ मराठींत घेतला असें लोक बोलतात.

सा०—नाभाजीच्या पुस्तकांत ज्ञानोबाची गोष्ट आहे काय ?

ब्रा०—त्यांत ज्ञानोबाचें नांव आहे खरें, परंतु त्याच्या चमत्कारांविषयीं कांहींच लिहिलें नाहीं.

सा०—तें नाभाजीनें केव्हां रचिलें बरें ?

ब्रा०—तो ग्रंथ होऊन २८९ वर्षें झालीं.

सा०—आतां ज्ञानोबा व नाभाजी यांमध्यें किती अंतर आहे तें पहा. २८९ वर्षांचें अंतर. नाभाजीच्या पुस्तकांत ज्ञानोबाची गोष्ट फार थोडक्यांत लिहिली आहे. त्यांत एवढेंच सांगितलें आहे कीं, तो फार गूढ गोष्टी सांगणारा होता. त्यावरून ज्ञानोबाविषयीं कांहींच प्रमाण पटत नाहीं.

कु०—असें कसें होईल? नाभाजीबुवा खोटें बोलले असतील कीं काय?

सा०—पाटील, आतां तुह्मींच विचार करून पाहा. नाभाजी व ज्ञानोबा यांमध्यें सुमारें तीनशें वर्षांचें अंतर असतां नाभाजीला ज्ञानोबाची गोष्ट कशी पुरतेपणें कळली असेल?

ब्रा०—आतां नाभाजीची गोष्ट असूंद्या. त्याविषयीं आह्मांस बरोबर ठाऊक नाहीं. परंतु महिपतीनें संतांविषयीं पुष्कळ गोष्टी दंतकथेवरून लिहिल्या असें त्यानें आपल्या पुस्तकांत साफ सांगितलें आहे. आणि महिपतीच्या वेळेस ज्ञानोबाची गोष्ट त्याच्या भक्तांकडून सर्व महाराष्ट्र देशांत पसरून गेली होती. त्यावरून महिपतीनें कांहीं खऱ्या, कांहीं खोट्या गोष्टी जमा करून एक ग्रंथ बनविला, असें साफ दिसतें.

सा०—ठीक, शास्त्रीबुवा; आपण ह्मणतां ही गोष्ट खरी आहे. आतां दंतकथेचा परिणाम काय होत असतो, याविषयीं आपण विचार करून पाहूं. जर शेण जमिनीवर पडलें तर काय होतें? तें माती घेऊन उठतें, आणि जर तें कांहीं वेळ राहिलें, तर त्याचा नाशहि होतो. दंतकथेचा परिणाम याप्रमाणें आहे. ती कांहीं वर्षांनंतर अगदीं बिघडती.

कु०—असें कसें ह्मणतां? आमच्या वाडवडिलांपासून ज्या शेंकडों वर्षांच्या गोष्टी आजपर्यंत चालत आल्या आहेत त्या सर्व खोट्या असें तुमच्या ह्मणण्यावरून दिसतें.

सा०—अगदीं खोट्या असें मी ह्मणत नाहीं, त्यांतील कांहीं अंश खरा असेल. बरें पाटीलबुवा, तीनशें वर्षांमागें तुमच्या गांवांत काय घडलें होतें हें कृपा करून सांगा.

कु०—मला काय माहीत? कालची याद आज राहत नाहीं, मग तीनशें वर्षांची याद कोठून राहील?

सा०—तर कोणास माहीत असेल बरें?

कु०—कोणास माहीत नाहीं.

सा०—तर दंतकथेवरून सांगा.

कु०—छे, ती काय कामाची?

सा०—ती कांहीं कामाची नाहीं, ही गोष्ट खरी. सुमारें पन्नास साठ वर्षांमध्यें दंतकथेंत फेरफार पडतो. ती एक पिढीपर्यंत कांहींशी बरी असती, दुसऱ्या पिढींत तिजमध्यें जमीन अस्मानीचें अंतर पडतें, तिसरींत तर तिचा अगदीं लोप होतो. असें बहुतकरून सर्वांच्या अनुभवास येतें. दंतकथेविषयीं अशी एक ह्मण आहे, "पराचा कावळा," ह्मणजे जर एक पर सांपडला तर त्याचा कावळा करावा,

अशी लोकांची चाल आहे. हें तुह्मांस ठाऊक नाहीं कीं काय?

ब्रा०—असें होत असतें खरें.

सा०—याविषयीं मी एक उदाहरण सांगतों. आसाई ह्मणून एक गांव आहे, तेथें ७८ वर्षांमागें मोठी लढाई झाली होती. एकदां मी फिरत फिरत त्या गांवास गेलों, आणि तेथील लोकांस त्या लढाईविषयीं पुसूं लागलों. तों एक दोन ह्मातारे माणसांशिवाय दुसऱ्या कोणासहि तिची माहिती नव्हती. आतां ते ह्मातारे मरून गेल्यावर पुढें काय होईल? एथें लढाई झाली होती खरी, पण ती देवादानवांत किंवा कौरवापांडवांत किंवा माणसामाणसांत झाली, हें कोणाच्यानें सांगवणार नाहीं. आणखी पाहा, तुह्मी हिंदु लोक फार भोळे आहां, जो कोणी कांहीं सांगेल त्याजवर तुह्मी भरंवसा ठेवितां, मग तें खरें किंवा खोटें याविषयीं तुह्मी कांहीं पहात नाहीं. याविषयीं एक गोष्ट सांगतों, ती चित्त देऊन ऐका. पांच वर्षांमागें मी कोंकणांत फिरत होतों, तेव्हां मला वाटेनें लोकांचा समुदाय भेटला. म्यां त्यांस पुसलें, तुह्मी कोठें गेलां होतां? ते ह्मणाले, पंढरीस. मी ह्मणालों, पंढरी तर या आंगास आहे, तुह्मी दुसरी पंढरी

कोठून काढिली? ते ह्मणाले, एथें पालीजवळ एक घपकें ह्मणून खेडेगांव आहे, तेथें भक्तीसाठीं विठोबाची स्वयंभू मूर्ति नदींतून निघाली आहे. आतां तेथें हजारों लोक यात्रेस जातात, आणि असें गातात "लोकहो हळू हळू चला, विठोबा कोंकणांत आला." मग मी ह्मणालों, ही गोष्ट खोटी असावी, तुह्मांला कोणी फसविण्यासाठीं थोतांड रचलें असेल. तेव्हां सर्वांनीं एकदांच आरोळी ठोकून नाहीं, नाहीं, खोटी नाहीं, तो विठोबा नवसास देखील पावतो, मग खोटी कशी ह्मणावी? असें ते बोलले, आतां या गोष्टीचा परिणाम तुह्मी ऐका. त्या विठोबाविषयीं चौकशी करीत असतां चार पांच महिन्यांनीं असा शोध लागला कीं, ती मूर्ति कोणी एका सुतारानें लोकांस ठकविण्यासाठीं रात्रीं नदींत पुरून ठेविली आणि लोकांस असें सांगितलें कीं, 'मी तुझ्या भेटीसाठीं एथें आलों, मी अमुक ठिकाणीं नदींत तुला सांपडेन,' असें विठोबानें स्वप्नांत प्रत्यक्ष दर्शन देऊन मला कळविलें. तो सुतार सचीवपंतांच्या अमलांतील राहणारा होता, ह्मणून पंतानें त्याच्या अपराधामुळें त्यास शिक्षा दिली. मग तो विठोबा खोटा, असें सर्व लोक कबूल झाले. आतां यांवरून

काय समजावें बरें? तुह्मी हिंदु लोक अगदीं भोळे व पराचा कावळा करणारे आहां, असें साफ दिसतें.

कु०—साहेब, ज्ञानोबाविषयीं आपलें मत काय आहे?

सा०—तो साधारण मनुष्य होता. त्याला बरेंच संस्कृत येत होतें, त्यानें गीतेवर ज्ञानेश्वरी नामें एक ग्रंथ टीकारूपें रचिला, इतकेंच. जसे तुकाराम, रामदास, वामनपंडित, मोरोपंत इत्यादि कवि होऊन गेले तसाच तो, इतर लोकांपेक्षां कांहीं हुशार आणि विद्वान् होता, ह्मणून भोळे लोक त्यास ईश्वरी पुरुष मानूं लागले.

शा०—माझेंहि मत असेंच आहे.

कु०—वाहावा! शास्त्रीबुवा, तुह्मी हिंदु असून साहेबाच्या मतास मिळालां. तुह्मी काय कराल? “ज्याची खावी पोळी, त्याची वाजवावी टाळी.”

सा०—पाटीलबुवा, तुह्मी रागावूं नका, शास्त्रीबुवांचें बोलणें खरें आहे. ते आमची पोळी खात नाहींत. आतां ज्ञानोबानें अमुकतमुक चमत्कार केले असें कांहीं लोक ह्मणतात, परंतु त्यानें कांहींच केलें नाहीं, अशी आमची पक्की खातरी आहे. आणि जरी त्यानें चमत्कार केले असले तरी ते आमच्या काय उपयोगी? त्यापासून तुह्मांला

काय लाभ होणार आहे? आतां तुह्मांस एक सद्गुरु व एक त्राता पाहिजे ही गोष्ट खरी आहे. पण ज्ञानोबा असा आहे काय? नाहीं. सद्गुरूचें काम काय आहे बरें? लोकांस त्यांच्या पापांतून काढून तारावें. तर असें कांहीं काम ज्ञानोबानें केलें कीं काय?

कु०—त्यानें ज्ञानेश्वरी लिहिली हा त्याचा लोकांवर केवढा उपकार झाला बरें?

**सा०**—ज्ञानेश्वरींत काय विशेष आहे? ती केवळ गीतेवर टीका आहे. आणि वास्तविक पाहिलें असतां गीतेंत जो रस व बोध आहे त्याचा शंभरावा हिस्सा देखील ज्ञानेश्वरींत नाहीं. बरें त्यानें कांहीं उपयोगी नवीन गोष्टी सांगितल्या ह्मणावें, तर त्याहि नाहींत. आणि ज्या जुन्या गोष्टी सांगितल्या त्या कांहीं उत्कृष्ट रीतीनें सांगितल्या नाहींत. ह्मणून तो फार विद्वान् नव्हता.

कु०—तो तारणारा तर आहे खरा. तो आह्मांसारिख्या भाविक लोकांसाठीं या समाधींत राहून आह्मांस दर्शन देतो ह्मणून एथें यात्रेस हजारों लोक येतात.

**सा०**—काय हे देवभोळे लोक! तो तारणारा कशावरून? त्यानें तारण्यासाठीं काय केलें? तो इतर लोकांसारिखा

जन्मला व मेला. तो लोकांसाठीं जन्मला नाहीं, आणि लोकांसाठीं मेला नाहीं, तर त्याला तारणारा कसें ह्मणावें? तुमचें पाप दूर व्हावयास त्यानें काय केलें? कांहीं नाहीं. आतां त्याचीं एथें हाडें मात्र राहिलीं असतील. आणि हाडांस भजणें हें जसें मुसलमान लोक एखादे प्रेतास कबरेंत पुरून पीर मानून भजतात, तसेंच आहे. शास्त्रीबुवा, असें भजणें योग्य आहे काय?

ब्रा०—छे, प्रेतास भजणें हें अगदीं मूर्खपण आहे.

सा०—खरें ह्मणतां, तर तुमचे ब्राह्मणहि हें वाईट काम कां करितात? आतां प्रथम तुह्मी ज्ञानोबाला सोडा, मग दुसरेहि सोडूं लागतील.

कु०—तर कोणत्या यात्रेस जावें? नाशिकास किंवा पंढरीस किंवा दुसरे कोठें?

सा०—नाहीं, नाहीं, कोठेंच जाऊं नये. "पोटभरी तीर्थ लाभ नाहीं," असें तुकाराम ह्मणतो. आतां पवित्र स्थान आणि पुण्यक्षेत्र कोणतें आहे, असें पुसाल तर सांगतों. शुद्ध मन हेंच पवित्र पुण्यक्षेत्र आहे. याशिवाय दुसरें पुण्यक्षेत्र नाहीं.

हें संभाषण ऐकून माझ्या मनांत पुष्कळ विचार आले.

मग मी त्या साहेबास ह्मणालों, साहेब, आपण ज्ञानोबाचें खंडण केलें, तरी कोणी सद्गुरु व तारणारा पाहिजे असें कबूल झालों तर सद्गुरु व तारणारा कोणी आहे कीं काय?

सा०—होय, आहे.

कु०—त्याचें नांव काय?

सा०—जर तुह्मी उगीच वादविवाद करणार नाहीं तर मी सांगेन. केवळ जो मनापासून खरा मार्ग प्राप्त व्हावा असें इच्छितो आणि भक्तिभावानें देवाची प्रार्थना करितो, तोच हा सद्गुरु जाणण्यास योग्य आहे. तुमचें मन असें आहे कीं काय?

मग मी उगाच राहिलों, कारण कीं मी मनःपूर्वक सत्यशोधक नाहीं, असें मी जाणतों. मग मी जाऊं लागलों, तेव्हां साहेब ह्मणाले कीं, कोणी ईश्वरी पुरुष मुख्य व श्रेष्ठ गुरु व तारणारा आहे, तुह्मांस त्याची प्राप्ति झाली असतां तुह्मी पापापासून मुक्त व्हाल यांत संशय नाहीं, हें तुह्मी पक्कें ध्यानांत ठेवा. आतां तुह्मी जा आणि ज्या गोष्टी मीं सांगितल्या त्यांविषयीं विचार करा, आणि मूर्तिपूजा टाकून परमेश्वराची प्रार्थना करा. जसें लेंकरूं आपल्या बापाकडे येतें, तसे तुह्मी ईश्वरास शरण जा, आणि त्याची

प्रार्थना करा; ती अशी कीं, हे ईश्वरा, तूं मला तारणाचा मार्ग दाखीव, आणि माझें सर्व पाप कशानें जाईल हें स्पष्ट समजीव, आणि खरा सद्गुरु व तारणारा कोण आहे हें कृपा करून कळीव. असें जर तुह्मी कराल तर खरा तारणारा व सद्गुरु याची गोष्ट ऐकावयास योग्य व्हाल. नाहींतर होणार नाहीं.

मग मी त्या साहेबाच्या बोलण्यास रुकार दिला.

पुढें कांहीं दिवसांनीं मी त्या साहेबाच्या एथें गेलों, आणि त्यास विनंती करून ह्मणालों कीं, अहो साहेब, आपण कांहीं दिवसांमागें यात्रेमध्यें सांगितल्याप्रमाणें मी ईश्वराची प्रार्थना करीत असतों. आतां कृपा करून मला तारणाची गोष्ट सांगा. तेव्हां साहेबानें मला पुष्कळ गोष्टी सांगितल्या, त्या मी येथें संक्षेपानें लिहितों.

साहेब बोलले कीं, सर्व माणसें पापी आहेत, ह्मणून तीं नरकदंडास योग्य आहेत, परंतु त्यांचा नाश व्हावा अशी ईश्वराची इच्छा नाहीं, ह्मणून त्यानें एक तारणारा पाठवून दिला. तो सर्वांलाच तारितो असें नाहीं, पण जो कोणी त्याजवर विश्वास ठेवितो, त्यासच तारितो. हा खरा तारणारा आणि ज्ञानोबा हे सारिखे आहेत असें तुह्मी समजूं नका.

त्या दोघांमध्यें फार अंतर आहे. ज्ञानोबा पृथ्वींतला होता; हा तर स्वर्गांतून आला. ज्ञानोबाला पृथ्वीवरील बाप होता; याला पृथ्वीवरील बाप नव्हता. ज्ञानोबा निपापी होता, हा निष्पापी होता. ज्ञानोबानें आह्मांसाठीं कांहीं तारणोपाय केला नाहीं, यानें तर आमचें तारण व्हावें ह्मणून मोठें प्रायश्चित्त भोगलें; ह्मणजे आह्मांसाठीं फार दुःख सोसून मरण पावला. ज्ञानोबा मरून मातीशीं मिळाला, हा तर मेलेल्यांमधून उठून स्वर्गलोकांत गेला. ज्ञानोबा परत येणार नाहीं; हा तर शेवटल्या दिवशीं जगांत पुन्हा येईल, आणि जे कोणी त्याजवर विश्वास ठेवितात त्यांस सार्वकालीक सुख देईल.

या गोष्टी ऐकून मी ह्मणालों: साहेब, याचें नांव काय?

**सा०**—अभिषिक्त तारणारा.

मग मी ह्मणालों: हें मोठें नवल आहे. मी पूर्वीं कधीं असें नांव ऐकिलें नाहीं, पण येशू ख्रिस्त असें नांव वारंवार ऐकिलें आहे.

**सा०**—होय, तोच तो. येशू ह्मणजे तारणारा, ख्रिस्त ह्मणजे अभिषिक्त. एकूण हें नांव तुह्मांस माहीत आहे! बरें तर याविषयीं हिंदु लोकांचें मत काय आहे?

तो कोणी मोठा साधु असून साहेब लोकांचा गुरु आहे, असें पुष्कळ हिंदु लोक ह्मणतात.

सा०—तो केवळ साहेब लोकांचाच तारणारा आहे असें नाहीं. तो इंग्लंड देशांत जन्मला नाहीं व तेथें कधीं गेला नाहीं. परंतु ज्या इंग्रज लोकांनीं त्याचें वर्त्तमान ऐकून त्याजवर विश्वास ठेविला ते सुखी झाले. आतां तुह्मीहि त्याजवर विश्वास ठेवा; ह्मणजे तुह्मी इहलोकीं पवित्र व सुखी होऊन परलोकींहि अक्षय सुख पावाल.

मग मी बोललों, बरें साहेब, तुह्मी आपल्या वाडवडिलांचा धर्म सोडिला कीं काय?

सा०—होय सोडिला.

मीं विचारलें, तो धर्म सोडल्यामुळें तुमच्या देवांनीं तुह्मांस कांहीं पीडा केली नाहीं काय?

सा०—नाहीं, अगदीं नाहीं. आह्मी खऱ्या देवाचा आणि या अभिषिक्त तारणाऱ्याचा आश्रय धरल्यामुळें सुखी झालों.

मग मी ह्मणालों, जर आह्मी असें केलें तर सुखी होऊं?

सा०—यांत काय संशय? खचीत सुखी व्हाल. तर आतां तुह्मी लवकर आपले खोटे देव सोडून ख्रिस्तास अं-

गोकारा. उशीर करूं नका. येणेंकरून ईश्वर तुमचें मोठें कल्याण करील.

शेवटीं साहेबानें हा अभंग ह्मटला.—

जय देवसुता प्रिय सर्वांहूनी ॥
आलासी वरूनी तारावया ॥ १ ॥
सागरीं पापाच्या सर्वहि बुडालों ॥
भ्रष्ट नष्ट झालों पातकानें ॥ २ ॥
ह्मणोनी पेटली नरकाची आग ॥
ईश्वराचा राग भयंकर ॥ ३ ॥
तूंची दयावंत मोठा देवसूत ॥
केली काकळूत आमुची त्वां ॥ ४ ॥
जामिन होऊनी ऋणहि फेडूनी ॥
नरकापासूनी तारीतोसी ॥ ५ ॥
दास ह्मणे, जय देवसुत जय ॥
दुरावलें भय नरकाचें ॥ ६ ॥

## येशू ख्रिस्ताचें पुनरुत्थान.

(मात्थींचें शुभवर्त्तमान, शेवटला अध्याय.)

तेव्हां पाहा, मोठा भूमिकंप झाला होता; कारण कीं, प्रभूचा दूत आकाशांतून उतरून येऊन दारापासून धोंडा लोटून त्यावर बसला होता, त्याचें स्वरूप विजेसारखें होतें, व त्याचें वस्त्र बर्फासारखें पांढरें होतें. तेव्हां त्याच्या भयानें पाहारेकरी थरथरां कापून मेल्यासारखे झाले. मग दूतानें त्या बायकांस उत्तर दिल्हें, भिऊं नका, कारण कीं, खांबीं दिलेला येशू याचा शोध तुह्मी करितां; हें मला ठाऊक आहे. तो एथें नाहीं. कां कीं, त्यानें सांगितल्याप्रमाणें तो उठला आहे. या, प्रभु निजला होता ती जागा पाहा. आणि लवकर जाऊन त्याच्या शिष्यांस सांगा कीं, तो मेलेल्यांमधून उठला आहे. आणि पाहा तो तुमच्या अगोदर गालीलांत जातो, तेथें तुह्मी त्याला पाहाल; पाहा, म्यां तुह्मांस सांगितलें आहे. तेव्हां त्या बायका भयानें व फार आनंदानें थड्यापासून लवकर निघून त्याच्या शिष्यांस वर्त्तमान सांगायास धांवल्या. मग त्या त्याच्या शिष्यांस तें सांगायास जात असतां पाहा, येशू त्यांस भेटला व ह्मणाला, सलाम. मग

त्यांनीं जवळ जाऊन त्याचे पाय धरिले व त्याला नमन केलें. तेव्हां येशूनें त्यांस ह्मटलें, भिऊं नका, जा, माझ्या भावांस सांगा कीं, गालीलांत जा ह्मणजे तेथें मला पाहाल. आणि त्या जात असतां पाहा, पाहारेकऱ्यांतील कित्येकांनीं नगरांत जाऊन सर्व झालेलें वर्त्तमान मुख्य याजकांस सांगितलें. तेव्हां येशू जवळ येऊन त्यांशीं बोलून असें ह्मणाला, आकाशांत व पृथ्वीवर सर्व अधिकार मला दिला आहे. यास्तव तुह्मी जाऊन सर्व देशांतील लोकांस शिष्य करा; त्यांस बापाच्या व पुत्राच्या व पवित्र आत्म्याच्या नामानें बाप्तिस्मा द्या. म्यां ज्या आज्ञा तुह्मांस दिल्या त्या सर्व पाळायास त्यांस शिकवा; आणि पाहा, काळाच्या समाप्तीपर्यंत मी तुह्मांबरोबर सर्वकाल आहें. आमेन.

# धर्मसंबंधीं ग्रंथ.

## किंमत नऊ पै.

पंढरपुरची यात्रा.
लहान ज्येन.
गुरुपरीक्षा.
पाप, त्याचा दोष व अनर्थ.
महमदी लोकांची शंकानिवृत्ति.
शास्त्रज्ञानदीपिका.
हेनरी आणि त्याचा गडी संभू.
हिंदुस्थानांतील तरुणांस पत्रें.
परीक्षण.
शंकानिवृत्ति.
मंगलसमाचारकथन.
स्तोत्रमाला.
बोधामृत.
खरा आश्रय.
आत्मारामपंत आणि मृत्युशिपाई.

## किंमत एक आणा.

तुकाराम याची गोष्ट.
वेदांत काय आहे ?
सदाचरणाच्या गोष्टी. [ लना.
हिंदुधर्म व ख्रिस्तीधर्म यांची तु-
इतिहासावरून घेतलेलीं प्रमाणें.
शूर कृत्यांच्या खऱ्या गोष्टी.
महंमदी धर्माविषयीं माहिती.
शास्त्रांतील उपदेशसार.
मुलांसाठीं बोधाच्या गोष्टी.
जेसिकेची पहिली प्रार्थना.
सदा रोगी सदा उद्योगी.
चमत्कारिक गोष्टी.
स्वर्गवर्णन.
पद्यमणिमाला. ( ३ आणे ).
पतित आणि पतितपावन.
पाहारेकऱ्याची वाणी.
ह्याताऱ्या हर्बर्टची घरची वाट.
ख्रिस्तीशास्त्र ईश्वरप्रेरित आहे
[ काय ?
येशू ख्रिस्ताचें पुनरुत्थान.
कृष्ण आणि ख्रिस्त यांची तुलना.
येशूकडे ये.

## किंमत एक आणा साहा पै.

उत्तम मित्र.
हिंदुलोकांच्या सणांविषयीं.
ख्रिस्तीधर्म खरा आहे काय?
संस्कृत सुबोध श्लोक.
मूर्तिपूजेविषयीं संभाषणें.
आमच्या लोकांच्या लग्न करण्याच्या रीती व त्यांचे परिणाम.

## किंमत दोन आणे.

जगत्शेटाचा पुत्र नरनायक.
ख्रिस्ती वीर.
दुखणाइतास समाधानाचीं वचनें ( ३ आणे ).
आमच्या आकाशांतील बापाची ममता.
पदार्थविद्या.
वेणु व दया.
आक्षेपविवेचन.
साहित्यशतक.
सुप्रभात.
रे० हरीपंतांचें चरित्र ( ४ व ६ आणे ).
गायनामृत.
शास्त्रांतले पशु.
गतेचखोऱ्यांतील लांकूडतोड्या.
प्रार्थना, ती करण्याचीं कारणें व तिचीं अंगें.
ख्रिस्तीधर्म व हिंदुधर्म ह्यांच्या परस्पर संबंधाविषयीं निबंध.

व्ह्यल्युपेअबलनें मागविल्यास हीं पुस्तकें पाठविलीं जातील.

ट्राक्ट आणि बुक सोसैटी.

धोबीतलाव, मुंबई,

